## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचा दिनांक २९/१२/२०१२ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८१/२०१२/जा.०९, दिनांक ०२/०१/२०१३.

३) टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ चा मालक मोहम्मद सलिम रशिद खान व चालक मोहम्मद अली मोहम्मद रफीतक खान यांचे वतीने ॲड. आनंद चरणबीर यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त एकत्रित निवेदन.

४) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ चा मालक मन्सुर अहमद अब्दुल हमीद व चालक कादीर शमशुद्दीन खान यांचे वतीने ॲड. आनंद चरणबीर यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त एकत्रित निवेदन.

५) मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी व रवाब अली मोहम्मद मुस्तकिम खान यांचे वतीने ॲड. आनंद चरणबीर यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त एकत्रित निवेदन.

६) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचा दिनांक २१/०१/२०१३ रोजीचे अभिवेदन.

७) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १३/०२/२०१३ रोजी पारीत केलेले आदेश.

८) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचेकडून दिनांक २०/०५/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवालाची प्रत.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८१/२०१२/जा. ५१७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०७ /०६/२०१३.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २४/१२/२०१२ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई येथे कर्तव्यावरील पोलिस अधिकारी पोलिस निरीक्षक श्री. ठाकरे यांनी आदेशित केल्यावरुन त्यांचेसह सपोनि पवार, सफौ पठाण, पो.शि.क्र.०६.१७९२/ नितीन शंकर धंगेकर, अंमलदार पो.शि.क्र. ०६.१६४/पाटील, पो.शि.क्र. ०६.१०५१/मोरे असे सर्व मिळून सरकारी

वाहनाने पूर्व द्रुतगती महामार्ग, विक्रोळी येथील गोदरेज सोप बस स्टॉप येथे पोहचले. तेथे सहाय्यक पोलिस आयुक्त, विक्रीकोर कोष, गुन्हे शाखा, मुंबई श्री. प्रफुल्ल जोशी हे उपस्थित होते. त्यांनी गुप्त माहितीदारांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मेसर्स मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीस सिल केलेले असतानाही सदरची माहिती दडवून रेल्वे आणि शासनाची फसवणूक करुन रेल्वेने लिलाव केलेले ट्रान्सफार्मर ऑईल विकत घेऊन त्यावर बेकायदेशिररित्या विनापरवाना प्रक्रिया करुन बेकायदेशिररित्या विक्री करणार आहेत, अशा रितीने फसवणूक करुन लिलावात विकत घेतलेला माल आयशर टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ व आयशर टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ यामधून पूर्व द्रुतगती महामार्गावरुन ठाण्याकडे नेला जाणार आहे. सदरचा माल सापळा रचून छापा टाकून जप्त करुन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावयाची असल्याने दोन पंचांना पाचारण करण्यात आले.

त्याप्रमाणे वरील पथकाने पंचांसह पूर्व द्रुतगती महामार्गावर गोदरेज सोप बस स्टॉप, विक्रोळी, मुंबई येथे सापळा रचून टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ आणि टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ याच्या प्रतिक्षेत उभे असतांना १५:१५ वाजताच्या सुमारास सहा पोलिस आयुक्त श्री. प्रफुल्ल जोशी यांनी त्यांना गुप्त बातमीदारांकडून माहिती मिळालेला टेम्पो थोड्याच वेळात गोदरेज सोप बस स्टॉप जवळून जाणार असल्याचे आणि तयारीत राहण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिस पथक व पंच तयारीत असतांना १५:२० वाजता नमुदचे टेम्पो गोदरेज सोप बस स्टॉप येथून पुढे जाऊ लागले तसे पोलिसांनी पोलिस वाहने त्यांच्या समोर घेऊन त्यांना हाताने टेम्पो रस्त्याच्या कडेला थांबविण्याचा इशारा केला. त्याप्रमाणे नमूद दोन्ही टेम्पो चालकांनी त्यांचे टेम्पो साधारण ५० मीटर्स पुढे जाऊन बाजूला घेतले. त्यापाठोपाठ पोलिस पथक व पंच पोलिस वाहनाने टेम्पोजवळ पोहचले. पोलिसांनी दोन्ही टेम्पो चालकांना खाली उतरावयास लावून त्यांना पोलिस व पंचांची ओळख करुन दिली आणि त्यांना दोन्ही टेम्पोच्या झडती घेण्याचा उद्देश समजावून सांगितला आणि त्यातील इसमांना त्यांचे नांव विचारले असता, टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ यामधील इसमांनी त्यांची नांवे मोहम्मद अली मोहम्मद रफीक खान, वाहन चालक व रजा उल्लाह मोहम्मद हुसैन चौधरी तसेच टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ मधील इसमाने त्याचे नांव कादीर शमसुद्दीन खान, वाहन चालक असे सांगितले.

वरील इसमांनी संमती दिल्यावर पोलिसांनी त्यांच्या व पंचांच्या समक्ष दोन्ही टेम्पोची झडती घेतली असता, त्यामध्ये खालीलप्रमाणे माल आढळून आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | पत्र्याचे २०० लि. क्षमता असलेले ट्रान्सफार्मर ऑईलने पूर्ण भरलेले एकूण २५ ड्रम | ५००० लि. | २,२५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | एक जुना वापरता आयशर मो/टेम्पो क्र.एमएच-०४-एफपी-५६५१ | १ नग | ६,००,०००/- |
| ३ | पत्र्याचे २०० लि. क्षमता असलेले ट्रान्सफार्मर ऑईलने पूर्ण भरलेले एकूण २५ ड्रम | ५००० लि. | २,२५,०००/- |
| ४ | एक जुना वापरता आयशर मो/टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-६७६४ | १ नग | ६,००,०००/- |
| | | एकूण | १६,५०,०००/- |

सदर मालाबाबत पोलिस अधिकाऱ्यांनी टेम्पोच्या चालकांकडे विचारणा केली असता, त्यांनी सदर मालाबाबतची कागदपत्रे दाखवली. त्यावरुन सदर माल मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीने रेल्वेकडून लिलावातून विकत घेतला आहे असे निष्पन्न झाले. त्याबाबत खातरजमा करुन घेण्यासाठी पोलिस निरिक्षक ठाकरे यांनी रेशनिंग अधिकारी श्री. शेख व जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. दुपारे यांच्याशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून सदर मेहेर कंपनीबाबत खातरजमा केली असता, नमूद मेहेर कंपनी ही रेशनिंग अधिकाऱ्यांनी यापूर्वीच सिल केलेली असल्याचे समजून आले. त्यावरुन अशी खात्री झाली की, नमुदचा माल हा मेहेर कंपनीशी संबंधित काही इसम व इतर असे मिळून संगनमत करुन कायदेशिर परवाना धारक असल्याचे भासवून व कंपनी सिल असल्याबाबतची माहिती दडवून रेल्वेची व शासनाची फसवणूक केली आहे. सदर इसमांकडे अधिक चौकशी केली असता, ते नमूदचा माल रवाबे अली मोहम्मद मुस्तकीम खान ऊर्फ मंगरु यांचे सांगण्यावरुन आपसात संगणमत करुन रेल्वेची फसवणूक करुन घेऊन जात आहेत. त्यावरुन द्रुतगती महामार्गावर वाहतुकीस अडथळा येऊ नये म्हणून पोलिसांनी त्यांच्या दोन्ही गाड्यांमध्ये दोन्ही टेम्पो आणि त्यांच्या मालकांसोबत प्रत्येकी एक पोलिस अंमलदार पो.शि.क्र. ०६.१५९२/धगेकर व पो.शि.क्र. ०६.१०५१/मोरे असे त्यांना घेऊन विक्रोळी पोलिस ठाणेच्या आवारात घेऊन आले. सदर ठिकाणी आल्यावर पोलिसांनी पंचांसमक्ष वरील नमूद माल त्यातील प्रत्येक ड्रममधून ९५० मिली चे प्लॅस्टिक बॉटलमध्ये नमुने घेऊन त्यावर पोलिस व पंचांचे सह्यांचे लेबल लावून त्यास जागीच सिल करण्यात आले. सिलबंद नमूने व दोन्ही टेम्पोंसह ताब्यात घेतलेला माल आणि वर नमूद तिन्ही इसमांना ताब्यात घेण्यात आले. तसेच त्यांचेकडील पुढील कागदपत्रे तपासकामी ताब्यात घेण्यात आली. १) सेंट्रल रेल्वेचे सेल्स इश्यू नोट क्र. ००१०८४८ आणि ००१०८४९. २) सेंट्रल रेल्वेचे डिपॉझिटर फॉईल क्र. ०५४६२३ ते ०५४६२५. ३) सेंट्रल रेल्वेचे लिलाव डिलीवरी आदेशाची कार्बन प्रत क्र. CRO/02 cat Sr. No-15. ४) सेंट्रल रेल्वेची पेमेंट स्लीप. ५) सेंट्रल रेल्वेच्या विकलेल्या मालाची उर्वरीत पेमेंट केल्याची पावती, व्हॅट भरल्याची पावती आणि इनकम टॅक्स भरल्याची पावती. ६) सेंट्रल रेल्वेला मेहेर पेट्रोकेम यांनी दि.१२/११/१२ रोजी पैसे भरल्याची पावती क्र. ४०३६७७. ७) दोन्ही टेम्पो चालकांचे चालक परवाने.

0004 अशाप्रकारे नमूद आरोपीतांनी एकमेकांशी संगणमत करुन मेसर्स मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीशी संबंधीत काही इसम यांनी संगणमत करुन मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीस सिल केलेले असतांनाही सदरची माहिती दडवून रेल्वे आणि शासनाची फसवणूक करुन रेल्वेने लिलाव केलेले ट्रान्सफार्मर ऑईल विकत घेऊन त्याची वाहतूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ४, ५, ६, ७ २) दि प्रिव्हेन्शन ऑफ ब्लॅक मार्केटिंग ॲण्ड मेन्टनन्स ऑफ सप्लाईज ऑफ इशेनशिअल कमोडिटिज ॲक्ट १९८० चे कलम ३, ३) दि पेट्रोलियम प्रॉडेक्ट (मेनटेन ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲन्ड सप्लायर्स) ऑर्डर १९९९ तसेच भादंवि चे कलम ४२०, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द विक्रोळी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २७६/२०१२, दिनांक २४/१२/२०१२ (गु.शा.नि, मुंबई गु.र.क्र. ०५/२०१२) अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि, मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २२/०१/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. एच. एस. आनंद हे टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ चा मालक मन्सुर अहमद अब्दुल हमीद व चालक कादीर शमशुद्दीन खान, मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी, टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ चा मालक मोहम्मद सलिम रशिद खान व चालक मोहम्मद अली मोहम्मद रफीक खान, रजा उल्लाह मोहम्मद हुसैन चौधरी आणि रवाबअली खान यांचे वतीने वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले निवेदने कायम असल्याची सांगितली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. एन.जी. पवार हे उपस्थित राहिले व यापूर्वी सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले.

तद्नंतर वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचेकडून दिनांक २०/०५/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवालात, " Exhibit no. 1 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 144°C, Exhibit no. 2 contain petroleum hydrocarbon oil having density 0.841 at 30°C and flash point 169°C, Exhibit no. 3 contain

petroleum hydrocarbon oil having density 0.841 at 30°C and flash point 151°C, Exhibit no. 4 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 161°C, Exhibit no. 5 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 6 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 7 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 8 contain petroleum hydrocarbon oil having density 0.841 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 9 contain petroleum hydrocarbon oil having density 0.850 at 30°C and flash point 146°C, Exhibit no. 10 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 148°C, Exhibit no. 11 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 12 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 146°C, Exhibit no. 13 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 14 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 15 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 16 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 152°C; Exhibit no. 17 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 18 contain petroleum hydrocarbon oil having density 0.841 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 19 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 20 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 21 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 22 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 23 contain petroleum hydrocarbon oil having density 0.852 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 24 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 25 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 26 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 27 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 28 contain petroleum hydrocarbon oil having density 0.846 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 29 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 30 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 31 contain petroleum hydrocarbon oil having density 0.846 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 32 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 33 contain petroleum hydrocarbon oil having density

0.842 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 34 contain petroleum hydrocarbon oil having density 0.841 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 35 contain petroleum hydrocarbon oil having density 0.848 at 30°C and flash point 152°C, Exhibit no. 36 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 37 contain petroleum hydrocarbon oil having density 0.841 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 38 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 146°C, Exhibit no. 39 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 40 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 146°C, Exhibit no. 41 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 42 contain petroleum hydrocarbon oil having density 0.851 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 43 contain petroleum hydrocarbon oil having density 0.841 at 30°C and flash point 150°C, Exhibit no. 44 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 148°C, Exhibit no. 45 contain petroleum hydrocarbon oil having density 0.847 at 30°C and flash point 148°C, Exhibit no. 46 contain petroleum hydrocarbon oil having density 0.839 at 30°C and flash point 148°C, Exhibit no. 47 contain petroleum hydrocarbon oil having density 0.840 at 30°C and flash point 148°C, Exhibit no. 48 contain petroleum hydrocarbon oil having density 0.846 at 30°C and flash point 148°C, Exhibit no. 49 contain petroleum hydrocarbon oil having density 0.851 at 30°C and flash point 146°C and Exhibit no. 50 contain petroleum hydrocarbon oil having density 0.839 at 30°C and flash point 148°C " असे नमूद केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

## युक्तिवाद :-

टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ चा मालक मोहम्मद सलिम रशिद खान व चालक मोहम्मद अली मोहम्मद रफीक खान यांचे वतीने ॲड. आनंद चरणबीर यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त एकत्रित निवेदनात, टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ चे मालक मोहम्मद सलिम रशिद खान व चालक मोहम्मद अली मोहम्मद रफिक खान या त्यांच्या अशिलांनी दिलेल्या माहितीनुसार ते सादर करु इच्छितात की, त्यांचे अशिल मोहम्मद सलिम रशिद खान हे टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ चे मालक असून सदरच्या टेम्पोवर एच.डी.एफ.सी. बँक लि., अंधेरी (पूर्व), मुंबई या बँकेचे कर्ज आहे. तसेच त्यांचे दुसरे अशिल मोहम्मद अली

मोहम्मद रफीक खान हे सदर टेम्पोचे चालक असून त्यांचा टेम्पोच्या मालकीबाबत कोणताही दावा नाही व सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यास त्याची काहीही हरकत नाही. त्यांच्या अशिलांचा मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. अथवा रव्वाब अली मोहम्मद मुस्तकीम खान उर्फ मंगरु यांच्या व्यवसायाशी काहीही संबंध नाही. तसेच रव्वाब अली हे नमुद कंपनीचे कमिशन एजंट असून त्याच्या अशिलाचा टेम्पो हा ऑईलची वाहतूक करताना पोलिसांनी जप्त केला आहे. सदरचा टेम्पो हा रव्वाब अली यांनी माल वाहतूकीसाठी भाडेतत्त्वावर घेतला असून त्यामुळे त्यांचा भाडेच्या रकमेशी संबंध असून त्यांचे अशिल हे नमुद कंपनीच्या अथवा रव्वाब अली यांच्या कोणत्याही प्रकारे संबंधीत नाही. त्यांचे अशिल हे गरीब आणि अशिक्षित असून टेम्पोच्या भाडेतत्त्वावरील मिळणाऱ्या रकमेवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. तसेच सदर रकमेतून ते बँकेचा हफ्ता भरीत आहेत. सदरचा व्यवसाय हा अनधिकृत अथवा बेकायदेशिर आहे किंवा कसे, याबाबत त्यांच्या अशिलांना काहीच माहिती नसून केवळ भाडे पोटी मिळणाऱ्या रकमेशी त्यांचा संबंध आहे. सदरचे रक्कम हे टेम्पोमालक स्वीकारीत असून चालकास मासिक पगार दिला जात आहे. सदरचा टेम्पो हा नाक्यावर उभा असल्याने कोणतीही गरजू व्यक्ती माल वाहतूकीसाठी टेम्पो घेऊन जात असतो. दिनांक २४/१२/२०१२ रोजी रव्वाब अली नामे इसमाने त्यांचा टेम्पो सेंट्रल रेल्वे डेपो करी रोड येथून मेहेर पेट्रोकेम प्रा. लि. यांच्या फॅक्ट्रीवर माल वाहतूकीसाठी २००० रुपये भाडे ठरविले होते. सदर भाड्याची रक्कम माल नियोजित ठिकाणी पोहच केल्यानंतर मिळणार होती. परंतू, दुर्देवाने पोलिसांनी विक्रोळी येथे त्यांचा टेम्पो जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याशी त्यांच्या अशिलांचा कोणताही संबंध नसल्याने त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केलेला नाही. त्यामुळे बजावण्यात आलेली नोटीस मागे घेऊन टेम्पो योग्य त्या अटी व शर्तीवर मुक्त करण्यात यावा, असे नमूद केले आहे.

टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ चा मालक मन्सुर अहमद अब्दुल हमीद व चालक कादीर शमशुद्दीन खान यांचे वतीने ॲड. आनंद चरणबीर यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त एकत्रित निवेदनात, टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ चे मालक मन्सुर अहमद अब्दुल हमीद व चालक कादीर शमशुद्दीन खान या त्यांच्या अशिलांनी दिलेल्या माहितीनुसार ते सादर करु इच्छितात की, त्यांचे अशिल मन्सुर अहमद अब्दुल हमीद हे टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ चे मालक असून सदरच्या टेम्पोवर एच.डी.एफ.सी. बँक लि., कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई या बँकेचे कर्ज आहे. तसेच त्यांचे दुसरे अशिल कादीर शमशुद्दीन खान हे सदर टेम्पोचे चालक असून त्यांचा टेम्पोच्या मालकीबाबत कोणताही दावा नाही व सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यास त्याची काहीही हरकत नाही. त्यांच्या अशिलांचा मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. अथवा रव्वाब अली मोहम्मद मुस्तकीम खान उर्फ मंगरु यांच्या व्यवसायाशी काहीही संबंध नाही. तसेच रव्वाब अली हे नमुद कंपनीचे कमिशन एजंट असून

त्याच्या अशिलाचा टेम्पो हा ऑईलची वाहतूक करताना पोलिसांनी जप्त केला आहे. सदरचा टेम्पो हा रव्वाब अली यांनी माल वाहतूकीसाठी भाडेतत्त्वावर घेतला असून त्यामुळे त्यांचा भाडेच्या रकमेशी संबंध असून त्यांचे अशिल हे नमुद कंपनीच्या अथवा रव्वाब अली यांच्या कोणत्याही प्रकारे संबंधीत नाही. त्यांचे अशिल हे गरीब आणि अशिक्षित असून टेम्पोच्या भाडेतत्त्वावरील मिळणाऱ्या रकमेवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. तसेच सदर रकमेतून ते बँकेचा हफ्ता भरीत आहेत. सदरचा व्यवसाय हा अनधिकृत अथवा बेकायदेशिर आहे किंवा कसे, याबाबत त्यांच्या अशिलांना काहीच माहिती नसून केवळ भाडे पोटी मिळणाऱ्या रकमेशी त्यांचा संबंध आहे. सदरचे रक्कम हे टेम्पोमालक स्वीकारीत असून चालकास मासिक पगार दिला जात आहे. सदरचा टेम्पो हा नाक्यावर उभा असल्याने कोणतीही गरजू व्यक्ती माल वाहतूकीसाठी टेम्पो घेऊन जात असतो. दिनांक २४/१२/२०१२ रोजी रव्वाब अली नामे इसमाने त्यांचा टेम्पो सेंट्रल रेल्वे डेपो करी रोड येथून मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. यांच्या फॅक्ट्रीवर माल वाहतूकीसाठी २००० रुपये भाडे ठरविले होते. सदर भाड्याची रक्कम माल नियोजित ठिकाणी पोहच केल्यानंतर मिळणार होती. परंतू, दुर्दैवाने पोलिसांनी विक्रोळी येथे त्यांचा टेम्पो जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याशी त्यांच्या अशिलांचा कोणताही संबंध नसल्याने त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तू कायदा, च्या तरतूदींचा भंग केलेला नाही. त्यामुळे बजावण्यात आलेली नोटीस मागे घेऊन टेम्पो योग्य त्या अटी व शर्तींवर मुक्त करण्यात यावा, असे नमूद केले आहे.

मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी व रव्वाब अली मोहम्मद मुस्तकिम खान यांचे वतीने ॲड. आनंद चरणबीर यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त एकत्रित निवेदनामे, त्यांचे अशिल फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी हे मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि., प्लॉट नं. १७, व्हिलेज हमरापूर, तालुका वाडा, जिल्हा ठाणे या ठिकाणी स्थित असलेल्या कंपनीचे संचालक असून त्यांच्या नमूद कंपनीत वेस्ट ऑईल/युस्ड ऑईल यांच्या रिरिफायनिंग व रिसायकलिंगचा व्यवसाय कार्यरत आहे. सदर व्यवसायाकरिता पर्यावरण आणि वन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडील संमतीपत्रही आहे. त्यांचे अशिल हे वेस्ट ऑईल/युस्ड ऑईल यांच्या रिरिफायनिंग व रिसायकलिंगचा व्यवसाय करीत असून सदरचे पदार्थ हे महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट ॲण्ड स्लॉप ऑर्डर, २००७ अंतर्गत अनुक्रमांक १ ते १४ मध्ये नमूद केलेल्या पदार्थामध्ये समाविष्ठ नाही. सदरची प्रक्रिया ही उत्पादनात समाविष्ठ नसल्याने तसेच त्यांचे अशिल हे प्रोसेसर नसल्याने ल्युब्रिकेटिंग ऑईल ॲण्ड ग्रिसेस ऑर्डर, १९८७ चे कलम २ सी अंतर्गत नमूद व्याख्येशी त्यांचा संबंध नाही. मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. यांच्या वाडा, जिल्हा ठाणे स्थित असलेल्या कंपनीवर गुन्हा नोंद प्रकरणी सिलबंद असलेली कंपनी मा. महानगर दंडाधिकारी, वाडा यांनी दिनांक १०/०१/२०१३ रोजी नमुद कंपनी

सिलमुक्त करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. हझारडस्ट वेस्ट (मॅनेजमेंट, हँडलिंग अ‍ॅण्ड ट्रान्सबॉऊन्ड्री मुव्हमेंट रुल्स २००८ अन्वये दिनांक २४/०९/२००८ रोजी पारीत केलेल्या अधिसुचनेनुसार ट्रान्सफॉर्मर ऑईल हे युस्ड ऑईलच्या व्याख्येमध्ये समाविष्ठ आहे. त्यामुळे सदर प्रकरणी सेंट्रल रेल्वे करी रोड येथून दिनांक १२/११/२०१२ रोजी लिलावामध्ये खरेदी केलेले ट्रान्सफॉर्मर ऑईल हे दिनांक २३/११/२०१२ रोजी वाडा येथील नमूद कंपनी सिलबंद करण्यापूर्वी खरेदी केल्याचे दिसून येते. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडील परवाना असल्याखेरीज लिलावात भाग घेणे शक्य नाही. त्याअनुषंगाने दिनांक १२/११/२०१२ रोजी झालेल्या लिलावात ट्रान्सफॉर्मर ऑईल खरेदी करण्यापूर्वी मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीच्या वतीने रव्वाब अली मोहम्मद मुस्तकीम खान उर्फ मंगरु यांनी कमिशंट एजंट म्हणून भाग घेऊन सदरचा साठा कमिशन पध्दतीवर ते वितरण करणार होते. सदरचा खरेदी केलेला वेस्ट ट्रान्सफॉर्मर ऑईलचा साठा हा अशुध्द असल्याने त्याच्यावर प्रक्रिया करुन ट्रान्सफॉर्मर ऑईल म्हणून विक्री केला जातो. त्यामुळे युस्ड वेस्ट ट्रान्सफॉर्मर ऑईल हे जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत समाविष्ठ नसल्याने त्यांनी कोणत्याही तरतुदींचा भंग केलेला नाही. त्यांचे अशिलाच्या वतीने ते नमुद करु इच्छितात की, त्यांनी कोणतेही बेकायदेशिर कृत्य न केल्याने अथवा केंद्र शासनाच्या कोणत्याही आदेशाचा भंग न केल्याने त्यांची कंपनी सिलमुक्त करण्यात अपेक्षीती आहे. तसेच सदरच ट्रान्सफॉर्मर ऑईलचा साठा हा नियमानुसार लिलावात भाग घेऊन खरेदी केला असल्याने त्याच्या वाहतुकीवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध नाहीत. सदर प्रकरणी, पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये त्यांच्या अशिलाने कोणत्याही नियमांचा भंग केला नसल्याने त्यांचा साठा जप्त करण्यात येऊ नये. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अंतर्गत युस्ड/वेस्ट ट्रान्सफॉर्मर ऑईल हे नाशवंत पदार्थ नसल्याने तसेच सदरचा साठा हा सेंट्रल रेल्वे येथून लिलावात खरेदी न केल्याबाबतचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्र अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यांचे अशिल रव्वाब अली मोहम्मद मुस्तकीम खान उर्फ मंगरु यांचा कोणत्याही प्रकारे युस्ड ट्रान्सफॉर्मर ऑईल या जप्त साठ्याशी संबंध नाही. त्यांनी केवळ कमिशन पध्दतीवर मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या फॅक्ट्रीवर माल वाहतुकी करण्यापूरता संबंध आहे. मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. यांच्याकडून कोणतेही गैरकृत्य अथवा फसवणूकीबाबत तक्रार नसल्याने भारतीय दंड विधानचे कलम ४२० हे लागू होत नाही. तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केला नसल्याचे दिसून येते. पोलिसांनी जप्त करण्यात आलेला वेस्ट ट्रान्सफॉर्मर ऑईलचा साठा हा ४,४५,०००/- रुपये किंमतीचा असून त्यामुळे सेंट्रल रेल्वे येथून खरेदी केलेला सदरचा साठा हा कोणत्याही अटी व शर्तीवर मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. यांना परत करण्यास रव्वाब अली मोहम्मद मुस्तकीम खान यांची कोणतीही हरकत नाही, असे नमूद आहे.

0010 वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचे प्राप्त अभिवेदनात, जप्त करण्यात आलेले टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१, टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ व जप्त मालाबाबत योग्य ते आदेश व्हावेत, अशी विनंती केली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १३/०२/२०१३ रोजी क्रिमिनल रिव्हिजन अप्लिकेशन क्र. ५१/२०१३ व ५२/२०१३ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार नमुद गुन्हा नोंद प्रकरणी गुन्हे शाखा नियंत्रण यांनी गुन्हा नोंद प्रकरण क्रमांक ०५/२०१२ अन्वये जप्त केलेले टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ व टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ ही दोन्ही वाहने रुपये ६,००,०००/- किंमतीचे प्रत्येकी बंधपत्रे घेऊन परत करण्याचे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तीवाद, निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढील आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २४/१२/२०१२ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांनी मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीस सिल केलेले असतानाही सदरची माहिती दडवून रेल्वे आणि शासनाची फसवणूक करुन रेल्वेने लिलाव केलेले ट्रान्सफार्मर ऑईल विकत घेऊन त्यावर बेकायदेशिररित्या विनापरवाना प्रक्रिया करुन बेकायदेशिररित्या विक्री करणार असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार गोदरेज सोप बस स्टॉप येथे सापळा रचून आयशर टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ व आयशर टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ पकडले व त्यांच्याकडे चौकशी केल्यानुसार आरोपीतांनी एकमेकांशी संगणमत करुन मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीशी संबंधीत काही इसम यांनी संगणमत करुन मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीस सिल केलेले असतांनाही सदरची माहिती दडवून रेल्वे आणि शासनाची फसवणूक करुन रेल्वेने लिलाव केलेले ट्रान्सफार्मर ऑईल विकत घेऊन त्याची वाहतूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द विक्रोळी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २७६/२०१२, दिनांक २४/१२/२०१२ (गु.शा.नि, मुंबई गु.र.क्र. ०५/२०१२) अन्वये गुन्हा नोंद करुन दोन्ही टेम्पो व त्यामधील पत्र्याचे २०० लि. क्षमता असलेले ट्रान्सफार्मर ऑईलने पूर्ण भरलेले एकूण ५० ड्रम असा एकूण १६,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दि ल्युब्रिकेटिंग ऑईल्स ॲण्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ हे आदेश दिनांक २०/०३/१९८७ रोजी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ अंतर्गत अंमलात आले आहे.

सदर आदेशाचे कलम २ (सी) अन्वये, "Processor means any person carrying on or proposing to carry on the business of processing, manufacturing, blending, compounding, packaging, refining, or re-refining or sale of any lubricating oil and grease and include his representative of agent but does not include the oil companies specified in Schedule I appended to this order." असे नमूद आहे.

कलम ३ अन्वये, "Restriction on processing and storage of lubricating oils and greases- No person shall carry on the business of a processor except under and in accordance with the terms and conditions of a valued licence granted to him under this order" असे नमूद आहे.

मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीच्या नावे उद्योग सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे यांच्याकडून क्रमांक जेडीआय/आरओ/ल्युब ऑईल्स ॲण्ड ग्रिसेस ऑर्डर, १९८७/१७/२०१२/६८, दिनांक ११/०१/२०१२ रोजी "Licence for Processing/ Manufacturing Industrial Unit under the Lubricating Oils and Greases (Processing Supply and Distribution Regulation) Order, 1987"अन्वये रिरिफायनिंग ऑफ युस्ड ऑईल्स करिता परवाना निर्गमित केल्याचे दिसून येते.

मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी यांनी केलेल्या खुलाशात, ते मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि., प्लॉट नं. १७, व्हिलेज हमरापूर, तालुका वाडा, जिल्हा ठाणे या ठिकाणी स्थित असलेल्या कंपनीचे संचालक असून त्यांच्या नमूद कंपनीत वेस्ट ऑईल/युस्ड ऑईल यांच्या रिरिफायनिंग व रिसायकलिंगचा व्यवसाय कार्यरत असून सदरचे पदार्थ हे महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट ॲण्ड स्लॉप ऑर्डर, २००७ अंतर्गत अनुक्रमांक १ ते १४ मध्ये नमूद केलेल्या पदार्थामध्ये समाविष्ठ नसल्याचे सांगितले. सदर रिरिफायनिंग व रिसायकलिंगची प्रक्रिया ही उत्पादनात समाविष्ठ नसल्याने तसेच ते प्रोसेसर नसल्याने ल्युब्रिकेटिंग ऑईल ॲण्ड ग्रिसेस ऑर्डर, १९८७ चे कलम २ सी अंतर्गत नमूद व्याख्येशी त्यांचा संबंध नसल्याचे सांगून मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. यांच्या वाडा, जिल्हा ठाणे स्थित असलेल्या कंपनीवर गुन्हा नोंद प्रकरणी सिलबंद असलेली कंपनी मा. महानगर दंडाधिकारी, वाडा यांनी दिनांक १०/०१/२०१३ रोजी नमुद कंपनी सिलमुक्त करण्याचे आदेश पारीत करण्यात आले असल्याचे सांगितले. सदरचा वेस्ट ट्रान्सफॉर्मर ऑईलचा साठा हा अशुध्द असल्याने त्याच्यावर प्रक्रिया करुन ट्रान्सफॉर्मर ऑईल म्हणून विक्री केला जातो. त्यामुळे युस्ड वेस्ट ट्रान्सफॉर्मर ऑईल हे जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत समाविष्ठ नसल्याने त्यांनी कोणत्याही तरतुदींचा भंग केलेला नाही, असे सांगितले आहे.

रव्वाब अली मोहम्मद मुस्तकिम खान यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी सेंट्रल रेल्वे करी रोड येथून दिनांक १२/११/२०१२ रोजी लिलावामध्ये खरेदी केलेले ट्रान्सफॉर्मर ऑईल हे दिनांक २३/११/२०१२ रोजी वाडा येथील मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. ही कंपनी सिलबंद करण्यापूर्वी खरेदी केले आहे. दिनांक १२/११/२०१२ रोजी झालेल्या

लिलावात ट्रान्सफॉर्मर ऑईल खरेदी करण्यापूर्वी मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या कंपनीच्या वतीने त्यांनी कमिशंट एजंट म्हणून भाग घेऊन सदरचा साठा कमिशन पध्दतीवर ते वितरण करणार होते असे सांगितले. सदरचा खरेदी केलेल्या युस्ड ट्रान्सफॉर्मर ऑईल या जप्त साठ्याशी त्यांचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही. त्यांनी केवळ कमिशन पध्दतीवर मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. या फॅक्टरीवर माल वाहतुकी करण्यापूरता संबंध असल्याचे सांगितले. सदरचा साठा हा कोणत्याही अटी व शर्तीवर मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. यांना परत करण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही, असे सांगितले आहे.

मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी यांनी तसेच रव्वाब अली मोहम्मद मुस्तकिम खान यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे असल्याचे दिसून येते. उपरोक्त निवेदनाचे अवलोकन केले असता, दोन्ही इसमांनी सादर केलेले एकत्रित निवेदन हे विपर्यास्त असून सदर प्रकरणी सेंट्रल रेल्वे येथून रव्वाब अली मोहम्मद मुस्तकिम खान यांनी कमिशन पध्दतीवर खरेदी केलेल्या साठ्याच्या मालकीचा दावा मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी करीत असल्याचे दिसून येत असून त्यांनी रिरिफायनिंग व रिसायकलिंगची प्रक्रिया उत्पादनात समाविष्ठ नसल्याचे सांगून युस्ड ट्रान्सफॉर्मर ऑईल हे सॉल्वंट पदार्थाच्या यादीमध्ये तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या यादीमध्ये समाविष्ठ नसल्याचे सांगितले. तसेच सुनावणीच्यावेळी उपस्थितांना सदरचा खरेदी केलेला युस्ड ट्रान्सफॉर्मर ऑईलचा साठा हा रिरिफायनिंग अथवा रिसायकलिंगच्या प्रक्रियेसाठी कोठे घेवुन जात असल्याबाबत विचारणा केली असता, उपस्थितांनी सदरचा साठा हा मे. मेहेर पेट्रोकेम प्रा. लि. हमरापूर, तालूका वाडा, जिल्हा ठाणे येथील कंपनीत घेवुन जात असल्याचे सांगितले.

तथापी, दिनांक २३ नोव्हेंबर २०१२ रोजी मे. मेहेर पेट्रोलियम प्रा. लि. हमरापूर, तालूका वाडा, जिल्हा ठाणे येथे राज्यस्तरीय दक्षता पथकाने धाड टाकुन कंपनीचे संचालक, फिरोज अब्दुल सुलतान पंचवानी व त्यांचे इतर संचालक यांचे विरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० तसेच दि महाराष्ट्र सॉल्वंट रॅफिनेट अँड स्लॉप (लायसन्सिग) ऑर्डर, २००७ मधील कलम ३ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द वाडा पोलिस ठाणे येथे शासनाच्या वतीने रितसर गुन्हा नोंद क्र. II/१०/२०१२, दिनांक २३/११/२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यांत येऊन एकूण रुपये १,९४,९३,०२२.८५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन नमूद कंपनी सिलबंद करण्यात आल्याची बाब निदर्शनास आणुन दिली असता उपस्थितांनी सदरची बाब मान्य करुन मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. यांच्या वाडा, जिल्हा ठाणे स्थित असलेल्या कंपनीवर गुन्हा नोंद प्रकरणी सिलबंद असलेली कंपनी मा. महानगर दंडाधिकारी, वाडा यांनी दिनांक १०/०१/२०१३ रोजी नमुद कंपनी सिलमुक्त करण्याचे आदेश पारीत करण्यात

आले असल्याचे सांगुन सदरचा वेस्ट ट्रान्सफॉर्मर ऑईलचा साठा हा अशुध्द असल्याने त्याच्यावर प्रक्रिया करुन ट्रान्सफॉर्मर ऑईल म्हणून विक्री केला जात असल्याचे सांगितले. उपरोक्त विवेचन हे दिशाभूल करणारे असुन मे. मेहेर पेट्रोकेम प्रा. लि. ही कंपनी दिनांक २३/११/२०१२ ते १०/०१/२०१३ या कालावधीमध्ये सिलबंद असतानाही मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक फिरोज अब्दुल सुलतान पंजवानी यांनी रव्वाब अली मोहम्मद मुस्तकिम खान या इसमाशी संगनमत करुन सदर कंपनीच्या नावे खरेदी केलेला युझ्ड ट्रान्सफॉर्मर ऑईलचा साठा हा दिनांक २४/१२/२०१२ रोजी नमूद सिलबंद असलेल्या कंपनीमध्ये शुद्धीकरणाच्या प्रक्रियेसाठी घेवुन जात असल्याचे खोटे विधान करुन तो अवैध वाहतुक करुन गैरमार्गाने विक्रीसाठी इतरत्र घेवुन जात असल्याचे निष्पन्न होत असल्याने त्यांनी दि ल्युब्रिकेटिंग ऑईल्स ॲण्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ या आदेशाचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केल्याचे सिद्ध होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेला ट्रान्सफॉर्मर ऑईलचा संपूर्ण अवैध साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सदर प्रकरणी, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १३/०२/२०१३ रोजी क्रिमिनल रिव्हिजन अप्लिकेशन क्र. ५१/२०१३ व ५२/२०१३ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार नमुद गुन्हा नोंद प्रकरणी गुन्हे शाखा नियंत्रण यांनी गुन्हा नोंद प्रकरण क्रमांक ०५/२०१२ अन्वये जप्त केलेले टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ व टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ ही दोन्ही वाहने रुपये ६,००,०००/- किंमतीचे प्रत्येकी बंधपत्रे घेऊन परत करण्याचे आदेश पारित केले आहेत. सबब, प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेले टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ व टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेश पारीत केले असल्याने, या मुद्देमालाबाबत पुन्हा भाष्य करण्याची आवश्यकता वाटत नाही.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये विक्रोळी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २७६/२०१२, दिनांक २४/१२/२०१२ (गु.शा.नि, मुंबई गु.र.क्र. ०५/२०१२) मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला पत्र्याचे २०० लि. क्षमता असलेले ट्रान्सफार्मर ऑईलने पूर्ण भरलेले एकूण ५० ड्रममधील संपुर्ण १०,००० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदरच्या साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ चा मालक
२) टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ चा चालक मोहम्मद अली मोहम्मद रफीक खान
३) टेम्पो क्र. एमएच-०४-एफपी-५६५१ मधील रजा उल्लाह मोहम्मद हुसैन चौधरी
४) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ चा मालक
५) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६७६४ चा चालक कादीर शमसुद्दीन खान
६) रवाब अली मोहम्मद मुस्तकीम खान ऊर्फ मंगरु
७) मे. मेहेर पेट्रोकेम प्रा.लि. चे संचालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

~~३) निवड नस्ती.~~

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2013\Ammal Aadesh\Aadesh.doc